# भारतातील बालशिक्षणाचा पाया

भारतातील आधुनिक बालशिक्षणाचा पाया घातला गेला तो फ्रोबेलच्या किंडरगार्डन पद्धतीचा शाळाशाळांसाठी लॉर्ड कर्झनने जो आग्रह धरला त्यामुळे. पण, अधिक बळकटपणे हे घडले ते मात्र माँटेसोरी बाईच्या विचार -आचारांच्या आधारे. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातच भारतात बालशिक्षण रूजू झाले. आता बालशिक्षण हे नुसते बालकांचे अल्पवयात केलेले शिक्षण, असे राहिले नाही. ते आता। 'शास्त्रीय बालशिक्षण' होऊ लागले. माँटेसोरी बाईंनी, बालशिक्षणाच्या क्षेत्रात प्रामुख्याने बालमानसशास्त्र आणले, या शास्त्रीय दृष्टिकोनाचे आकर्षण , गिजूभाई बधेका, सरलादेवी साराभाई, नानाभाई भट्ट, ताराबाई मोडक आणि त्यांचे तत्कालीन सहकारी यांना वाटले. माँटेसोरी बाईंनी बुद्धिविकासाची अनेक साधने बालशाळेत आणली होती, त्यांचेही अग्रुप भारतीय बालशिक्षणप्रेमींना वाटले. माँटेसोरीबाईचा, बालशिक्षणात जीवनशिक्षण समाविष्ट करण्याचा आणि बालकांच्या विकासात त्याचे आगळे -वेगळे परिणाम दाखविणारा प्रयोग तर भारतीय शिक्षणप्रेमींना उचलूनच धरला. बालशिक्षणाबाबतची एक शास्त्रीयदृष्टी घेऊन भारतात भावनगर, अहमदाबाद या ठिकाणी प्रयोग होऊ लागले. प्रयोगांचे यश शास्त्रीयतेच्या पायावर जोखून पाहिले गेले.

गिजूभाई बधेका, सरलादेवी साराभाई, ताराबाई मोडक या भारतातील बालशिक्षण प्रणेत्यांनी माँटेसोरीबाईंचे शास्त्रीय बालशिक्षण भारतात अवलंबले, एवढेच त्यांचे श्रेय नाही. यांचे कर्तृत्त्व याहून कितीतरी मोठे आहे. या मंडळींनी शास्त्रीय बालशिक्षण हा विषय सुमारे अर्धशतकभर सातत्याने नि मिशनरी वृत्तीने धरून ठेवला. माँटेसोरीबाईंच्या शैक्षणिक साधनांचा आपल्या परीने विकास केला. माँटेसोरीबाईंच्या, ज्ञानेंद्रिये नि कर्मेंद्रिये यांच्या विकासाची संकल्पना घेऊन तिला भारतीय जीवनातील वस्तूंचा, कृतीचा नि अनुभवांचा साज चढविला. शास्त्रीय बालशिक्षणाचे भारतीयीकरण केले आणि अशा रीतीने नुसते बालशिक्षणच नव्हे तर बालशिक्षणाचे शास्त्रही पुढे नेले.

गिजूभाई बधेका यांनी भावनगरला दक्षिणामूर्ती संस्थेत १९१८ मध्ये पहिली बालवाडी काढली आणि पुढे आपल्या अखेरच्या दिवसांपर्यंत म्हणजे १९३९ पर्यंत, एकवीस वर्षे याच एका विषयाचा ध्यास घेतला. ताराबाई मोडक १९२३ मध्ये त्यांच्या या प्रयोगात सामील झाल्या आणि पुढे, त्यांनीच म्हटल्याप्रमाणे, त्यांना गिजूभाईच्या तालमीत तयार होत असतानाच 'बालरोग' जडला. याच विषयाच्या ध्यास घेऊन त्यांनी पन्नास वर्षे काम केले. ३१ ऑगस्ट १९७३ ला त्यांचे निध न झाले. सरलादेवी, साराभाई यांनी अगदी विसाव्या शतकाच्या सुरूवातीलाच, आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी (प्रसिद्ध अणुशास्त्रज्ञ विक्रम साराभाई हे या मुलांपैकीच एक) इंग्लंडहून खास माँटेसोरी प्रशिक्षित शिक्षिका आणून बालशिक्षणाचे कार्य सुरू केले । होते.

१९२३ साली गिजूभाई, ताराबाईंनी माँटेसोरी शिक्षण संघ' स्थापन करण्याचा घाट घातला, तेव्हा सरलादेवी साराभाईंचे बळकट हात त्यामागे उभे राहिले. कालांतराने याच माँटेसोरीसंघाचे रूपांतर ' नूतन बालशिक्षण संघा 'त झाले. आणि आपल्या समर्थ अध्यक्षतेखाली सरलादेवींनी ही संस्था नावारूपाला आणली.

नूतन बालशिक्षण संघाच्याद्व रे, भारतातील बालशिक्षण प्रणेत्यांनी, बालशिक्षणाचे एक व्यापक आंदोलनच उभे केले; अत्यंत नियोजित पद्धतीने ते भारतभर विस्तारले. बालशिक्षणाबाबतची, शास्त्रीय बालशिक्षणाच्या भारतातील विकासाची एक चतुःसूत्रीच या मंडळींनी अवलंबिली होती. अभ्यासपूर्ण प्रयोग, बाल -शिक्षकांचे शास्त्रीय प्रशिक्षण, बालवयाचे नि बालशिक्षणाचे सामाजिक प्रबोधन आणि शास्त्रीय बालशाळांच्या नमुन्यांचार प्रसार असे हे चतुर्विध कार्य होते.

महात्मा गांधीनी, आगाखान पॅलेसमधील बंदिवासातून मुक्तता झाल्यानंतर, बालशिक्षणाचा एक नवा पैलू आपल्या बुनियाद शिक्षणाच्या संकल्पनेत समाविष्ट केला. आईच्या गर्भात अस्तित्त्व प्रकट झाल्यापासूनच बालकाची, पर्यायाने मातेची काळजी घ्यावी लागते; आणि थेट वयाच्या सहा-सात वर्षांपर्यंतच्या बालकाच्या शिक्षणावर काही खास लक्ष देण्याची गरज गांधीजींनी प्रतिपादन केली. गांधीजींनी याच कारणाने बुनियादी शिक्षणाला पूर्व बुनियादी शिक्षणाची जोड दिली. या शिक्षणाच्या प्रयोगासाठी नेमलेल्या अभ्यासक्रम समितीचे अध्यक्षपद सरलादेवींकडेच दिले होते आणि ताराबाई मोडक या त्या समितीच्या एक सदस्य होत्या. स्वतः ताराबाई मोडक यांनी, बालशिक्षणाच्या प्रयोगांना भारतीय । परिस्थितीमधील अत्यावश्यक असे आणखी एक परिणाम आपल्या कार्याला जोडले. ते होते ग्रामीण बालशिक्षणाचे. ताराबाई मोडक यांनी, अनुताई वाघ यांच्या समवेत, 'ग्रामबाल शिक्षा केंद्र' स्थापन करून ठाणे जिल्हयात बोर्डी येथे ग्रामीण बालशिक्षणाची मुहूर्तमेढ १९४५ मध्ये रोवली. सर्वच

जाती - धर्माच्या बालकांना ब लवाडीत एकत्र आणण्याचा सामाजिक अभिसरणाचाही एक प्रयोग, अनुषंगाने, पण तरीही जाणूनबुजून अमलात आणला गेला. पुढे १९५६ पासून आदिवासी शिक्षणाचे प्रयोग कोसबाड येथे करण्यात आले. या प्रयोगांचे दहेरी वैशिष्टय आहे. एक म्हणजे,

बालशिक्षण समाजाच्या अगदी तळाच्या बालकापर्यंत पोचविण्याचा हा गंभीरतेने नि ठरवून, समजून - उमजून केलेला प्रयत्न होता. हा प्रयोग म्हणजे समाजाच्या निम्नस्तरांतील, त्या वर्गाला शिक्षणाच्या समान संधीकडे नेणे होय. शास्त्रीय बालशिक्षणाची संधी ही सामाजिक विषमतेच्या मुळावरच घाव घालणारी ठरू शकते; इतके सामर्थ्य त्यामध्ये आहे. हे ताराबाई - अनुताईंच्या प्रयोगांनी दाखवून दिले आहे. उणीव आहे ती सामाजिक नि शासकीय जाणीव निर्मितीची. कोसबाडमधील प्रयोगाचे दुसरे एक वैशिष्टय आहे, ते सबंध बालशिक्षण शास्त्रामध्येच भर घालणारे आहे. वंचित मुलांना शिक्षणप्रवाहात आणण्याचा विचार सातत्याने बोलून दाखविला जातो. सरकारी धोरणांची पावले नेहमीच याच दिशेने टाकली जातात. त्यासाठी काही

आकर्षणे निर्माण करण्याचा,लालुच दाखविण्याचाही वृथा प्रयत्न, कित्येकदा अपयशी ठरूनही चालू राहतो. कोसबाडच्या बालशिक्षणप्रयोगांनी नेमकी उलटी दिशा घेतली आणि म्हणून आ ज कोसबाड परिसरातल्या आदिवासींच्या - वारल्यांच्या तीन पिढया शिकलेल्या आढळतात. 'शिक्षणप्रवाह वंचित मुलांकडे नेण्याचा प्रयत्न केला गेला.

वंचित मुलांना अस्तित्त्वात असलेल्या शिक्षणप्रवाहात आणण्याचा प्रयत्न जेव्हा केला जातो, तेव्हा आपली शिक्षण चौकट पक्की असते. त्याला अनुसरून या वंचित मुलांनी बदलावे अशी अपेक्षा केली जाते, आणि त्याचे अपयश आपण अनेक दशके भोगतच आहोत. याउलट, शिक्षणाचा प्रवाह वंचित मुलांपर्यंत नेण्याचा प्रयत्न जेव्हा केला जातो, तेव्हा त्या काटयाकुटयांच्या, दगडगोटयांच्या प्रदेशात, शिक्षणप्रवाहालाही वेगळी वळणे घेऊन, नवीन वाटा शोधत जावे लागते. शिक्षणालाच, वंचितांच्या जीवनपठडीस अनुसरून, त्या बालकांच्या गरजांनुरूप बदलावे लागते. शिक्षणाला जीवनभिमुख असे वळणाचे नवे रूप घ्यावे लागते. अशाप्रकारे शिक्षण जीवनातच मिसळले तर ते जीवन परिवर्तनाचे साधन बनू शकते. कोसबाडच्या प्रयोगांनी हा नवा विचार बालशिक्षणात आणला आहे. बालवाडी, अंगणवाडी, विकासवाडी, कुरणशाळा, रात्रशाळा अशा अनेक नमुन्यांची निर्मिती तेथे झाली. आणि ते घडतांना शिक्षणाची शास्त्रीयता कणभरही ढळू दिली नव्हती. बालशिक्षणशास्त्रात समाजजीवनाभिमुख अशा बालशिक्षणाच्या प्रतिमानांची नवी भरच घातली गेली. केवळ बालशिक्षण नव्हे तर अगदी प्राथमिक, माध्यमिक शिक्षणाच्या प्रवाहामध्ये समाजगटांच्या गरजांनुसार बदलण्याचे भान ठेवावे. आपल्या शिक्षणाचा आधीच ठरविलेला ढाचा महत्त्वाचा नाही, तर ज्याला शिकायचे आहे तो, विद्यार्थी महत्त्वाचा आहे, हे आधुनिक शिक्षणातले मूलभूत तत्त्व आहे.

शिक्षण हे शिकणाऱ्यासाठी असते, ही जाण, नव्या शिक्षणाच्या निर्मितीची बुनियाद आहे; पायाची वीट आहे!

❖